दिनांक २३.०९.२०२५.

**प्रेसनोट**

आरोपी लोकसेवक गोविंद संभाजी दहीफळे, वय ३७ वर्ष, पद इन्चार्ज डेटा एंट्री ऑपरेटर (कंत्राटी) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली. रा. चिखली, ता. अहमदपुर, जि. लातुर, ह.मु. श्री झवर यांचे राहते घरी किरायाने, सरस्वती नगर, हिंगोली यांनी तक्रारदार यांचेकडे ५०,०००/- लाचेची मागणी करून त्यापैकी १०,०००/- रू. दि. २३.०९.२०२५ रोजी व उर्वरीत रक्कम काम झाल्यावर स्विकारण्यास पंचासमक्ष सहमती दर्शवुन दि. २३.०९.२०२५ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक दहीफळे यांनी १०,०००/- रूपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली (शहर), जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

पिडीत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, हिंगोली येथे दि. २२.०९.२०२५ रोजी तक्रार दिली होती की, तक्रारदाराचे आई व चुलत मामा हे बांधकाम कामगार मजूर म्हणुन काम करत होते. त्यांची आई व चुलत मामा यांचे महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली येथे नोंदणी केलेली होती. बांधकाम मजुर मृत्यु पावल्याचे नंतर त्यांना महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या कार्यालयाकडुन विमा मंजुर होतो.

तक्रारदार यांची आई व मामा, यांचे मृत्युनंतर तक्रारदार यांनी त्यांचे आईचा दि. ०५.०५.२०२५ रोजी व चुलत मामाचा एप्रील २०२५ रोजी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ हिंगोली येथे विमा (क्लेम) मिळविण्यासाठी प्रकरण दाखल केले होते. त्यानंतर तक्रारदार यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ कार्यालयातील दहीफळे यांची दि. २२.०९.२०२५ रोजी भेट घेतली असता, ते तक्रारदार यांना म्हणाले की, माझी व साहेबांची ओळख आहे. तुझं काम करून देतो त्यासाठी तुला ५०,०००/- रूपये दयावे लागेल असे म्हणून तक्रारदार यांचेकडे पैशाची मागणी केले बाबत तक्रारदार यांची दि. २२.०९.२०२५ रोजी तक्रार प्राप्त झाली.

दि. २२.०९.२०२५ रोजी सदर तक्रारीची पंच साक्षीदार यांचे समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आरोपी गोविंद संभाजी दहीफळे, वय ३७ वर्ष, पद इन्चार्ज डेटा एंट्री ऑपरेटर (कंत्राटी) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली यांनी तक्रारदार यांची आई व मामा, यांचे मृत्यु नंतर तक्रारदार यांनी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, हिंगोली येथे विमा (क्लेम) मिळण्यासाठी दाखल केलेल्या प्रकरणाचे काम करून देण्यासाठी ५०,०००/- रूपये देवुन टाक दोन्हीचे असे म्हणुन लाचेची मागणी केली. त्यापैकी १०,०००/- रूपये दि. २३.०९.२०२५ रोजी व उरलेली रक्कम काम झाल्यावर स्विकारण्यास पंच साक्षीदार यांचे समक्ष सहमती दर्शविली.

दि. २३.०९.२०२५ रोजी सापळा कारवाईचे आयोजन केले असता यातील आरोपी गोविंद संभाजी दहीफळे यांनी तक्रारदार यांच्याकडुन १०,०००/- रूपये लाचेची रक्कम संजिवनी बाल रूग्णालयाचे समोर रोडवर तापडीया इस्टेट हिंगोली येथे पंच साक्षीदारा समक्ष स्वत: स्विकारली असता त्यांना लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर येथे गुरनं ७३०/२०२५ कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, सपोउपनि युनूस शेख, विजय शुक्ला, पोह भगवान मंडलिक, गजानन पवार, रविंद्र वरणे, पो.शि. पुंडगे, वाघ, जाधव, चापोह शेख अकबर सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांक़ावर संपर्क साधावा.

मा.श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मो.क्र. ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९
श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली, मो.क्र. ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६-२२३०५५.
व्हॉटसअप क्रमांक ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४

23/09

( विकास घनवट )
पोलीस उपअधिक्षक,
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner